MHRG190007612023

## :: भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक ८८/२०२० मधील निशाणी क्र.२६ वरील आदेश ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १, नियम १० अन्वये त्यांना प्रस्तुत भुसंपादन निर्देशन अर्जामध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.

०२. अर्ज व अर्जाला अर्जदार व सामनेवाला क्र.३ यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदाराचे कथन की, मौजे भोमजाई, ता.महाड, जि.रायगड येथे सदर रेफरन्स अर्जातील अर्जदार व प्रस्तुत अर्जातील अर्जदार क्र.१ चे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ चे वडील परशुराम सुडकोजी मंगळेकर हे सहमालक होते व आहेत. सामनेवाला क्र.१ यांनी नागेश्वरी लघु पाटबंधारे योजनेच्या बुडीत क्षेत्रासाठी संपादित केलेली आहे. संपादनापोटी जाहीर केलेल्या निवाडयाप्रमाणे अत्यंत कमी व अन्यायकारक नुकसान भरपाई दिल्याने अर्जदार यांनी वाढीव नुकसान भरपाई मिळण्याकरिता प्रस्तुतचा रेफरन्स अर्ज दाखल केलेला होता. सदरचा अर्ज दाखल करण्यापुर्वी अनेक वर्षापासुन कै.परशुराम सुडकोजी मंगळेकर बेपत्ता झालेले होते व त्यांचा तपास कधीही लागला नाही. त्यानंतर रे.मु.नं.१४०/२०२१ अन्वये दिनांक २९.११.२०२२ रोजी परशुराम सुडकोजी मंगळेकर यांचा नागरी मृत्यु

झाल्याचे जाहीर केले आहे. त्यांच्या मृत्युपश्चात प्रस्तुत अर्जदार हेच वारस असल्यामुळे हक्कदार व आवश्यक पक्षकार म्हणुन अ.नं.२२ ते २४ कडे त्यांची नावे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहेत. अर्जदार यांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करण्यास परवानगी दिल्यास मुळ अर्जदार यांचेवर कोणताही अन्याय होणार नाही याउलट नैसर्गिक न्यायतत्वानी ज्याचा त्याला हिस्सा मिळणे सुलभ व सोईचे होईल. तरी अर्जदार यांना आवश्यक पक्षकार म्हणुन प्रस्तुत रेफरन्स अर्जात समाविष्ट करुन घेण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्जास विरोध करताना मुळ अर्जदार यांनी अर्जातील कथने खरी व बरोबर असुन योग्य ते न्यायाचे आदेश होणेस नम्र विनंती केली आहे. याउलट सामनेवाला क्र.३ यांनी सदर अर्जास आक्षेप घेतला आहे.

०५. अर्ज उभयपक्षाच्या युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुतचा मुळ अर्ज संपादित जमीनीच्या मागणीची वाढीव बाजारभावाची रक्कम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. मुळ रेफरन्स अर्जातील अर्जदारासोबतच प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे मिळकतीचे वारस असल्याचे दिसुन येते. मुळ अर्जदार यांनी प्रस्तुतच्या अर्जदारांना आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करण्यास काहीही हरकत नसल्याचे कथन केले आहे.

०६. वर नमून केल्याप्रमाणे प्रस्तुत अर्जदार यांनी दावा मिळकती हया त्याच्या पुर्वजाच्या मिळकती असुन मुळ अर्जदार व प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे सदर मिळकतीचे वारस असल्याचे दिसुन येते. अर्जदारांचे कथन विचारात घेता त्यांना मुळ अर्जात बाजू मांडण्यास संधी देणे न्यायसंगत व

न्यायोचित आहे. अर्जदारांना अर्जात मागणी केल्याप्रमाणे आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करुन बाजू मांडण्याची संधी दिल्यास मुळ अर्जदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउपर सर्व अर्जदारांचे कथन विचारात घेऊन अर्ज गुणदोषावर निकाली निघेल. एकुणच अर्जदार यांनी उपस्थित केलेली हरकत तथा आक्षेप लक्षात घेता त्यांना मुळ अर्जात आवश्यक पक्षकार म्हणून सामील करून घेण्याची मागणी ही उचित व न्यायसंगत असल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात येतो. सदर निष्कर्षास अनुसरुन खालील आदेश पारित.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार यांना मुळ अर्जामध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन समाविष्ठ करावे असे आदेशित करण्यात येते.

३. अर्जदारांनी आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यत करावी.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.02.05 15:20:51 +0530

महाड
दिनांक ०५.०२.२०२६

**(श्रीमती एच.आर.जाधव)**
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड
रायगड – अलिबाग